सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक : एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/जाहिरात** **दिनांक : १८ ऑक्टोबर , २०२१**

**-: घोषणा :-**

**विषय :- सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा- २०२०**
**अर्ज सादर करण्याबाबत**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार, दिनांक १५ मार्च, २०२० रोजी आयोजित सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा- २०२० च्या दिनांक २४ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहीर करण्यात आलेल्या निकालासंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्रमांक ७१८/२०२१ प्रकरणी मा. न्यायाधिकरणाच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या आदेशानुसार विषयांकित परीक्षेचा सुधारित निकाल दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे.

**२.** दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी जाहीर करण्यात आलेल्या सुधारित निकालानुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना अर्ज सादर करण्याकरीता **दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ रोजी दुपारी १४.०० वाजल्यापासून दिनांक २६ ऑक्टोबर, २०२१ रोजी २३:५९ वाजेपर्यंत** वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**३.** आयोगामार्फत दिनांक ०२ सप्टेंबर, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेतील **“अर्ज सादर करण्याची पद्धत ”** मधील तरतुदीनुसार पात्र उमेदवारांनी अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

**४.** यापूर्वी प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

**५.** मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करून ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक २६ ऑक्टोबर, २०२१ रोजी २३:५९ वाजेपर्यत** पूर्ण करणे आवश्यक आहे.

**६.** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक २७ ऑक्टोबर, २०२१** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षाशुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**७.** उमेदवारांनी अर्ज सादर करतानाच जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

**८.** विहित कालावधीनंतर अर्ज सादर करण्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**९.** प्रस्तुत परीक्षेसंदर्भातील इतर अटी व शर्ती दिनांक ०२ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या अधिसूचनेमध्ये नमूद केल्यानुसार राहतील.

सहसचिव,(जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग